Literacy for a Billion

Movie: Aai Thor Tujhe Upkaar
Year: 1999

Song: Vahini baai Vahini Baai
Lyricist: Jagdish Khebudkar

वहिनी बाई वहिनी बाई
कशी असेल वहिनी बाई
वहिनी बाई वहिनी बाई
कशी असेल वहिनी बाई
घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई
हे घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई
वहिनी बाई वहिनी बाई
कशी असेल ए
कशी असेल सांग ना
कशी असेल वहिनी बाई
घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई
घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई

शुभंकराची घडी जणू की
सुखाची पहाट आली
अंगणातल्या प्राजक्ताची
अमृतवर्षा झाली
शुभंकराची घडी जणू की
सुखाची पहाट आली
अंगणातल्या प्राजक्ताची
अमृतवर्षा झाली
दीर लाडका भाऊजी मी
करीन वेडी माया
मुखी अन्नपूर्णेच्या हाती
घास मिळावा खाया

रागवेल का रूसेल गं
हळूच गाली हसेल गं
कळे न मजला काही
कळे न मजला काही

वहिनी बाई वहिनी बाई
कशी असेल वहिनी बाई
घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई
घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई

परी नसावी पुरी असावी
चकणी तिरळी रंभा
थोरा घरची लेक लाडकी
महामाया जगदंबा
महामाया जगदंबा

अशी पूर्व पुण्याई माझी
अशी लक्ष्मी यावी
चिमणा राजा घरात येता
अंगाई मी गावी
अंगाई मी गावी
स्वप्न असे मी जपले गं
या डोळ्यांनी टिपले गं
जीव हरपूनी जाई
जीव हरपूनी जाई
वहिनी बाई वहिनी बाई
कशी असेल वहिनी बाई

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

Literacy for a Billion

घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई
घरी दारी मांडवात
उडेल लगीन घाई

वहिनी बाई वहिनी बाई
कशी असेल ओ
कशी असेल आं
कशी असेल वहिनी बाई

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*